# वसई विरार शहर महानगरपालिका

## वैद्यकीय आरोग्य विभाग

## थेट मुलाखती (Walk in Interview)

जावक क्र.वविशम/वैआवि/६२१/२०२१ दि.३१/०५/२०२१

विषय :- कोरोना विषाणू (कोविड-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी वसई विरार शहर महानगरपालिकेत विशेषतज्ञ वैद्यकीय अधिकारी, वैद्यकीय अधिकारी एम.बी.बी.एस., जी.एन.एम., फार्मासिस्ट प्रयोगशाळा सहाय्यक व क्ष-किरण सहाय्यक या पदासाठी करार पद्धतीने दरमहा ठोक मानधन तत्वावर नेमणूक करणेबाबत.

कोरोना विषाणू (कोविड-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याकरिता वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कोव्हीड केअर सेंटर, क्वारंटाईन सेंटर, समर्पित कोव्हीड हेल्थ सेंटर व समर्पित कोव्हीड रुग्णालये येथे विशेषतज्ञ वैद्यकीय अधिकारी, वैद्यकीय अधिकारी एम.बी.बी.एस., जी.एन.एम., फार्मासिस्ट, प्रयोगशाळा सहाय्यक व क्ष-किरण सहाय्यक या पदावर करार पध्दतीवर काम करण्यासाठी खालील नमुद केलेली शैक्षणिक अर्हता व पात्रता धारण करणाऱ्या इच्छुक उमेदवारांनी थेट मुलाखती (Walk in Interview) कामी विहित नमुन्यातील अर्ज व आवश्यक त्या प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रतींसह वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभाग, चौथा मजला, प्रभाग समिती ‘सी’ कार्यालय, बहुउद्देशीय इमारत, विरार (पू.) येथे मुलाखतीसाठी उपस्थित रहावे.

| अ.क्र. | पदनाम | शैक्षणिक अर्हता | पद संख्या | मासिक ठोक एकत्रित मानधन |
|---|---|---|---|---|
| १. | वैद्यकीय अधिकारी स्त्रीरोग तज्ञ | मान्यताप्राप्त विद्यापीठाची एम.डी.(स्त्री व प्रसूतीरोग शास्त्र) किंवा समकक्ष पदवी आणि महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलकडील नोंदणी प्रमाणपत्र. | २० किंवा (आवश्यकतेनुसार) | रु.८५,०००/- |
| २. | वैद्यकीय अधिकारी भिषक (फिजिशियन) | मान्यताप्राप्त विद्यापीठाची एम.डी.(मेडिसीन) किंवा समकक्ष पदवी आणि महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलकडील नोंदणी प्रमाणपत्र. | २० किंवा (आवश्यकतेनुसार) | रु.८५,०००/- |
| ३. | वैद्यकीय अधिकारी भूलतज्ञ | मान्यताप्राप्त विद्यापीठाची एम.डी. (ॲनास्थेशिया) किंवा समकक्ष पदवी आणि महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलकडील नोंदणी प्रमाणपत्र. | २० किंवा (आवश्यकतेनुसार) | रु.८५,०००/- |
| ४. | वैद्यकीय अधिकारी बालरोग तज्ञ | मान्यताप्राप्त विद्यापीठाची एम.डी./डी.सी.एच./ एम.डी. (बालरोग चिकित्सा शास्त्र) किंवा समकक्ष पदवी आणि महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलकडील नोंदणी प्रमाणपत्र. | २० किंवा (आवश्यकतेनुसार) | रु.८५,०००/- |
| ५. | वैद्यकीय अधिकारी कान,नाक,घसा तज्ञ | मान्यताप्राप्त विद्यापीठाची एम.एस.(कान,नाक,घसा) ई.एन.टी. किंवा समकक्ष पदवी आणि महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलकडील नोंदणी प्रमाणपत्र. | २० किंवा (आवश्यकतेनुसार) | रु.८५,०००/- |
| ६. | वैद्यकीय अधिकारी नेत्र शल्यचिकित्सक | मान्यताप्राप्त विद्यापीठाची एम.एस. (नेत्र चिकित्साशास्त्र) किंवा एम.बी.बी.एस. व डी.ओ.एम.एस. (नेत्र चिकित्साशास्त्र) पदवी आणि महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलकडील नोंदणी प्रमाणपत्र. | २० किंवा (आवश्यकतेनुसार) | रु.८५,०००/- |
| ७. | वैद्यकीय अधिकारी दंत शल्यचिकित्सक | मान्यताप्राप्त विद्यापीठाची दंतशास्त्रातील बी.डी.एस. पदवी आणि महाराष्ट्र डेंन्टल कौन्सिलकडील नोंदणी प्रमाणपत्र. | २० किंवा (आवश्यकतेनुसार) | रु.५५,०००/- |
| ८. | वैद्यकीय अधिकारी एम.बी.बी.एस. | मान्यताप्राप्त विद्यापीठाची एम.बी.बी.एस. पदवी व महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलकडील नोंदणी प्रमाणपत्र. | ५० किंवा (आवश्यकतेनुसार) | रु.७५,०००/- |
| ९. | जी.एन.एम. (अधिपरिचारिका) | महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाची १२ वी परीक्षा उत्तीर्ण, महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची जनरल नर्सिंग व मिडवाईफरी विषयाची पदविका/B.sc नर्सिंग उत्तीर्ण आणि महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची नोंदणी आवश्यक. | १०० किंवा (आवश्यकतेनुसार) | रु.३४,८००/- |
| १०. | फार्मासिस्ट | उच्च माध्यमिक शालांत परीक्षा (विज्ञान) शाखा उत्तीर्ण आणि औषध निर्माण शास्त्रातील पदविका डी.फार्म./बी.फार्म. फार्मसी कौन्सिल ऑफ इंडियाची नोंदणी आवश्यक. | ५० किंवा (आवश्यकतेनुसार) | रु.२०,८००/- |
| ११. | प्रयोगशाळा सहाय्यक | उच्च माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण, व शासन मान्यताप्राप्त संस्थेची डी.एम.एल.टी. परीक्षा उत्तीर्ण | ५० किंवा (आवश्यकतेनुसार) | रु.१८,७००/- |
| १२. | क्ष-किरण सहाय्यक | उच्च माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण, शासन मान्यताप्राप्त संस्थेतून ‘क्ष’ किरण अभ्यासक्रम पूर्ण | ५० किंवा (आवश्यकतेनुसार) | रु.१८,७००/- |

**अटी व शर्ती :-**

१. उपरोक्त पदांकरीता कालावधी ६ महिने किंवा कोरोना (कोविड १९) प्रादुर्भाव संपेपर्यंत, जे आधी घडेल तोपर्यंत.
२. वैद्यकीय अधिकारी वर्गाकरीता वयाची अट नाही. उर्वरित पदांच्या वयोमर्यादा ४५ वर्षापर्यंत.

**अर्ज करण्याची पद्धत :-**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभाग, चौथा मजला, प्रभाग समिती - सी, बहुउद्देशीय इमारत, विरार (पूर्व) येथे संपूर्ण तपशिलासह दि.०१/०६/२०२१ ते दि.१५/०६/२०२१ पर्यंत सकाळी ११ ते १ वाजता या वेळेत (सार्वजनिक सुट्टीचा दिवस वगळून) अर्ज सादर करावा. अर्जाचा नमुना www.vvcmc.in या संकेतस्थळावर प्रसिध्द केलेला आहे. अर्जासोबत आवश्यक ती कागदपत्रे सादर करण्यात यावी.

**कंत्राटी/करार पध्दतीने सेवा घेणेची पध्दत :-**

अर्ज घेताना मूळ कागदपत्रांची तपासणी करुन अर्ज स्वीकारण्यात येतील. कागदपत्रांची छाननी झाल्यानंतर जे उमेदवार शैक्षणिक अर्हता व अनुभव धारण करित असतील त्यांची थेट मुलाखतीद्वारे निवड करण्यांत येईल. थेट मुलाखती नंतर आवश्यकते प्रमाणे सदर पदांच्या उमेदवारांची सेवा घेणेत येईल.

**इतर अटी व शर्ती :-**

१. उपरोक्त पदांकरीता नियुक्ती कालावधी ६ महिने किंवा कोरोना (कोविड-१९) प्रादुर्भाव संपेपर्यंत, जे आधी घडले तोपर्यंत राहील. तथापि यापुढे सुध्दा सेवा लागणार असेल तर उमेदवाराच्या सेवा, वर्तणूक इ. बाबी तपासून मुदतवाढ देण्याबाबतचा निर्णय मा.आयुक्त वसई विरार शहर महानगरपालिका यांनी राखून ठेवला आहे.
२. छाननी नंतर योग्य उमेदवारांची निवड करण्याचे अंतिम निर्णय मा.आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांना राहील.
३. उपरोक्त पदसंख्येत वाढ किंवा घट करणेचा अधिकार मा. आयुक्त यांना राहील.
४. सदरची नेमणूक तात्पुरती असल्याने उमेदवारांची निवड स्थानिक परिस्थिती व गरजेनुरुप करण्यात येणार आहे. याबाबत कोणतीही विचारणा दुरध्वनीवर करण्यात येऊ नये.
५. उमेदवार हा वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात राहणारा असल्यास त्यास प्रथम प्राधान्य देण्यात येईल.
६. करार पद्धतीने निवड करावयाच्या अधिकारी/कर्मचारी यांनी विहित नमुन्यातील करारनामा भरुन देणे आवश्यक आहे.
७. सदर उमेदवारांना महानगरपालिका सेवेत कायम होणेकरिता हक्क सांगता येणार नाही. तसेच त्यांना कायम कर्मचाऱ्यांचे लाभ अनुज्ञेय होणार नाहीत. सदरची नियुक्ती करार पध्दतीने असल्याने कोणत्याही न्यायालयात दावा दाखल करता येणार नाही.
८. रुग्णालयात कामाचा अनुभव असणाऱ्यांना प्राधान्य देण्यात येईल.
९. निवड झाल्यानंतर ३ दिवसांत उमेदवाराने त्याची सेवा पुरवावी लागेल. तथापि उमेदवार हजर न झाल्यास ठेवण्यात आलेल्या प्रतिक्षा यादीतील पुढील उमेदवाराची सेवा घेण्यात येईल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.
१०. भरती प्रक्रियेदरम्यान सर्व अधिकार मा.आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांना असून कोणत्याही टप्प्यावर भरती स्थगित करण्याचे अधिकार मा.आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांनी राखून ठेवले आहेत.

(मा.आयुक्त सो. यांचे मान्यतेने)

सही/-
उप-आयुक्त (वैद्यकीय आरोग्य)
वसई विरार शहर महानगरपालिका

## अर्जाचा नमुना

(वसई-विरार शहर महानगरपालिका ---------------------------------------- या पदासाठी अर्ज)

| |
|---|
| उमेदवाराचा नजीकच्या काळातील (रुंदी ३.५ से.मी व उंची ४.५ से.मी) आकाराचा फोटो चिटकवून स्वतः साक्षांकीत करावा |

प्रति,
मा.आयुक्त सो.
वसई विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार
विरार पूर्व, ता.वसई, जि.पालघर, पिन ४०१ ३०५.

**संपुर्ण नांव मराठी व इंग्रजी (कॅपिटल लेटर)**

| संपुर्ण नांव | मराठी | इंग्रजी (कॅपिटल लेटर) |
|---|---|---|
| १) आडनांव : | -------------------------------------- | -------------------------------------- |
| २) स्वतःचे नांव : | -------------------------------------- | -------------------------------------- |
| ३) वडिलांचे/पतीचे नाव : | -------------------------------------- | -------------------------------------- |
| ४) आईचे नाव : | -------------------------------------- | -------------------------------------- |

२) पत्रव्यवहाराचा संपुर्ण पत्ता (पिन कोडसहित)

----------------------------------------------------------------------------------------------------
----------------------------------------------------------------------------------------------------
----------------------------------------------------------------------------------------------------
----------------------------------------------------------------------------------------------------
--------------------------------------------------------------------------------

संपर्कासाठी दुरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक : ------------------------------------------------------------

३) अ) जन्मतारीख

| तारीख | महिना | वर्ष |
|---|---|---|
| | | |

दि.०१/०६/२०२१ रोजीचे वय

| वर्ष | महिने | दिवस |
|---|---|---|
| | | |

५) शैक्षणिक अर्हता

| अ.क्र. | उत्तीर्ण केलेली परिक्षा | विद्यापीठ/मंडळाचे नाव | परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | टक्केवारी व श्रेणी |
|---|---|---|---|---|
| १. | | | | |
| २. | | | | |
| ३. | | | | |
| ४. | | | | |
| ५ | | | | |

६) अनुभव-

| संस्थेचे नाव व पत्ता | कालावधी | | एकूण वर्षे |
|---|---|---|---|
| | पासून | पर्यंत | |
| | | | |
| | | | |
| | | | |

७) अर्जासोबत खालील (छायांकित) सत्यप्रती जोडलेल्या आहेत.

१ शैक्षणिक पात्रता प्रमाणपत्र व गुणपत्रिका (१०वी • १२वी • पदवी)
२ नोंदणी प्रमाणपत्र
३ शाळा सोडल्याचा दाखला
४ पॅन कार्ड व आधार कार्ड

८) राष्ट्रीयत्व : भारतीय / अभारतीय
९) अर्जदार महाराष्ट्राचा अधिवासी आहे काय ? : होय / नाही

मी असे प्रमाणित करतो/करते की, वर नमुद केलेली माहिती खरी असुन, ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल आणि माझे विरुध्द कायदेशीर कारवाई होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण :- अर्जदाराची सही------------------

दिनांक :- (नाव -----------------------------)